

*गायक वसंत आजगावकर हे पं. बेहरेबुवा यांचे शिष्य. पं. एस.के. अभ्यंकर यांच्याकडे आठ वर्षं शास्त्रीय संगीताचं शिक्षण त्यांनी घेतलं. आजगावकरांच्या जाहीर कार्यक्रमांचं यंदा सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. त्यांच्या अनेक कार्यक्रमांची सुरुवात डोंबिवलीतच झाली आहे. डोंबिवली हे टुमदार शहर आज बकाल झाल्याची खंत त्यांना आहे. मात्र इथला रसिकपणा कायम असल्याचं त्यांना नेहमीच जाणवतं.*

# डोंबिवलीकर रसिकच!

आम्ही डोंबिवलीला राहायला आलो सुमारे ६० वर्षांपूर्वी. त्या वेळची डोंबिवली हे एक टुमदार गाव होतं. आम्ही राहायचो तो शिवमंदिर रस्ता अतिशय सुंदर होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूला शिरीषाचे वृक्ष होते. भर उन्हाळ्यातही रस्त्यावर सावली असायची. सकाळी पक्ष्यांच्या किलबिलाटाने जाग येई. कसलेही बेसूर आवाज नसत.

मी गाणं शिकायला सुरुवात केली १९५६ मध्ये. त्या काळी पं. एस. के. अभ्यंकर, पं. निंबर्गीबुवा, पं. गजाननराव जोशी ही संगीतक्षेत्रातील मातब्बर मंडळी डोंबिवलीत होती. अनेक शिष्य त्यांच्याकडे तयार झाले. बाळासाहेब प्रधान, मुकुंदराव थत्ते हे माझे त्या वेळचे गुरुबंधू. गजाननबुवांची शिष्यशाखा खूप नावारूपाला आली. पुढे शिवानंद स्वामी संगीत प्रतिष्ठान स्थापन होऊन त्याद्वारे शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम अजूनही होतात. पं. जगन्नाथबुवा पुरोहितांच्या शिष्या लीलाताई करंबळेकर आणि त्यांचे पती जयराम करंबळेकर यांनी संगीत आणि नाट्यक्षेत्राला खूप योगदान दिलं. गणेश मंदिर आणि अन्य काही ठिकाणी गणेश उत्सवांत भावगीतांचे कार्यक्रम होत, ते ऐकायला मिळत. कीर्तनांचेही कार्यक्रम होत.

मी भावगीत गायनाकडे वळलो, ते दिवस भावगीतांच्या वैभवाचे होते. माझे ज्येष्ठ स्नेही वा. य. गाडगीळ, शं. ना. नवरे, प्रभाकर अत्रे यांच्यामुळे गावातल्या महत्त्वाच्या कार्यक्रमात मला गाण्याची संधी मिळे. त्यामुळे स्वातंत्र्यवीर सावरकर, आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे, ग.दि. माडगूळकर, पु. भा. भावे आदी मान्यवरांसमोर गाण्याची संधी मिळाली.

नंतर मी आकाशवाणीसाठी गाऊ लागलो. 'गीतरामायण' त्या काळात गाजत होतं. तेही मी गाऊ लागलो. त्यामुळे सुधीर फडक्यांचे आशीर्वाद आणि स्नेह लाभला. ठाण्याला कौपिनेश्वर मंदिरात तर रामनवमीला गेली चाळीसएक वर्षं माझा कार्यक्रम होतो. आजही तरुण श्रोते गीतरामायणाला आवर्जून येतात. तसंच डोंबिवलीतील धनंजय भोसेकर, निनाद आजगावकर आदी गायक बाबूजींच्या गीतरामायणाशी इमान राखून कार्यक्रम करतात. हे पाहून

## पाहुणचार

मराठी भाषा असेपर्यंत गीतरामायण गायलं आणि ऐकलं जाई, असा मला विश्वास वाटतो.

मी अनेक नव्या कार्यक्रमांची निर्मिती केली. त्यातल्या बहुतेक कार्यक्रमांचा प्रथम प्रयोग डोंबिवलीत केला आणि डोंबिवलीकर रसिकांनी मला भरभरून प्रतिसाद दिला. 'गीतमहाभारत'चा पहिला प्रायोगिक कार्यक्रम इथल्या चित्रकार ओतुरकर यांच्या कलामंदिरात केला. माझ्या अपेक्षेच्या तिप्पट श्रोत्यांनी गर्दी करून कार्यक्रम यशस्वी केला. त्यानंतर तो सुधीर फडके यांच्या अध्यक्षतेखाली दादरच्या शिवाजी मंदिरात सादर केला आणि त्याला उत्तम यश लाभलं.

'मर्ढेकरांची कविता-एक नादानुभव' हा कवी बा. सी. मर्ढेकर यांच्या कवितांचा संगीतबद्ध कार्यक्रमाला डोंबिवलीच्या सुसंस्कृत रसिकांनी तुडुंब गर्दी केली. अंदमानचे माजी नायब राज्यपाल राम कापसे यांनी अनपेक्षितपणे भाषण करून कौतुक केलं होतं. आचार्य अत्रे यांच्या जन्मशताब्दी प्रित्यर्थ त्यांच्या विडंबन कवितांना मी संगीतबद्ध करून त्यांचा 'झेंडूची फुले- साग्रसंगीत' हा कार्यक्रमही मसापच्या डोंबिवली शाखेने सादर केला. त्या कार्यक्रमाला पुढे महाराष्ट्रभर अमाप यश लाभलं.

माझ्या सुरुवातीच्या बहुतेक कार्यक्रमांना डोंबिवलीतलेच सहकारी कलाकार असत. नीळकंठ खटावकर, अनंत दांडेकर, मधुकर रायकर या वादक कलाकारांनी मला सुमारे तीस एक वर्ष सलग साथ केली. आजही डोंबिवलीतलेच संदीप मयेकर, पंकज धोपावकर, मकरंद नाईक, व्यंकटेश कुलकर्णी आदी कलाकार माझ्याबरोबर बऱ्याच वेळा असतात.

भावगीत गायनाची परंपरा माझ्यानंतरही डोंबिवलीतले प्रभंजन मराठे, विनायक जोशी आदी गायक उत्तम रीतीने जपत आहेत आणि त्यांनी चांगलं नाव केलं आहे.

डोंबिवलीच्या पूर्वीचा चेहरा आज अनेक बाबतीत बदलला आहे. पूर्वीचं एकोप्याचं टुमदार गाव नाहीसं होऊन आज काहीसा बकालपणा आला आहे. पण डोंबिवलीचा सांस्कृतिक चेहरा, रसिकपणा मात्र पूर्वीसारखाच आहे. आजही डोंबिवली रसिक श्रोते साहित्यिक सांगितिक कार्यक्रम, व्याख्यानमाला अशा कार्यक्रमांना प्रेमानं गर्दी करतात.